गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्हात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

Titie code MAHMAR 52037

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक १२९ ● बुधवार १० मे २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| Volume 1 | Issue 129 | Date : 10/05/2023 | blow :Wednesday | Page 4 | Price 4

## शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर मार्ग काढण्यासाठी राज्यस्तरीय समिती : मुख्यमंत्री शिंदे



**मुंबई : शेतकऱ्यांचा उत्पादनखर्च कमी करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना तसेच शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्यांवर मार्ग काढण्यासाठी राज्यस्तरीय समिती स्थापन करण्यात यावी, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.**

शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांवर आयोजित बैठकीत मुख्यमंत्री बोलत होते.सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे आज विनायकराव पाटील यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांवर चर्चा केली, कृषिमंत्री अब्दुल सत्तार, बंदरे व खनिकर्म मंत्री दादाजी भुसे, आमदार ज्ञानराज चौगुले यांचेसह वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, कृषि विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, ऊर्जा विभागाच्या प्रधान सचिव श्रीमती आभा शुक्ला, मदत व पुनर्वसन प्रधान सचिव असीमकुमार गुप्ता, सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे आदी उपस्थित होते.

शेतकऱ्यांना दिवसा आठ तास वीजपुरवठा देण्याच्या उद्दिष्टाने सुरु करण्यात आलेल्या मुख्यमंत्री सौर कृषि वाहिनी योजनेतून ६ हजार कृषि फीडर्स सौर ऊर्जेवर आणण्यात येणार आहेत असे सांगून शेतकऱ्यांच्या थकीत वीजबिलासाठी वीज पुरवठा खंडीत करु नये असे निर्देश दिले असून त्याची अंमलबजावणी होत असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

सव्वा दोन लाख सौर कृषि पंप देण्याचे उद्दिष्ट असून गेल्या वर्षी ७५ हजार सौर कृषिपंप बसविण्यात आले आहेत. ज्यांना वीजेची जोडणी नाही त्यांना प्राधान्याने सौर कृषिपंप देण्याचे धोरण असून ज्यांच्याकडे वीजजोडणी आहे, त्यांनी मागणी केल्यास त्यांनाही सौर कृषिपंप देण्यासाठी सविस्तर कार्यक्रम तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी दिले.

केवळ एक रुपया भरुन प्रधानमंत्री पीक विमा । **पान २ वर**

## पीक कर्जासाठी 'सिबिल स्कोअर' मागणाऱ्या बँकांवर फौजदारी गुन्हा दाखल करा : ना.देवेंद्र फडणवीस




अमरावती : शेतकरी बांधवांना पीक कर्ज सुलभपणे मिळण्यासाठी त्यांना बँकांनी 'सिबिल स्कोअर'चे निकष लावू नयेत. तसे 'आरबीआय'चेही निर्देश आहेत. पीककर्जासाठी शेतकरी बांधवांची अडवणूक झाल्यास बँकांवर तत्काळ फौजदारी कारवाई करावी, असे स्पष्ट निर्देश राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे दिले.

अमरावती जिल्हा खरीप हंगामपूर्व आढावा बैठक उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली, त्यावेळी ते बोलत होते. खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार बच्चू कडू, आमदार प्रवीण पोटे पाटील, आमदार राजकुमार पटेल, आमदार प्रताप अडसड, आमदार बळवंतराव वानखडे, आमदार किरण सरनाईक, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी, जिल्हाधिकारी पवनीत कौर, जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी अविश्यांत पंडा, पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, शेतकऱ्यांना कृषी कर्ज सहजतेने उपलब्ध झाले पाहिजे. बँकांनी सिबिल स्कोअर मागता कामा नये. काही बँकांनी विविध योजनांच्या अनुदानाचे पैसे कर्जखात्यात टाकल्याच्या तक्रारी आहेत. असा प्रकार घडता कामा नये. त्यावर तत्काळ कारवाई व्हावी. जलयुक्त शिवार योजनेचे काम झालेल्या ठिकाणी कमी पर्जन्यमान असतानाही संरक्षित सिंचन मिळून पिकांची उत्पादकता राखली गेली. त्यामुळे पर्जन्यमानाची अनिश्चितता लक्षात घेता जलयुक्त शिवार योजनेची प्रभावी अंमलबजावणी व्हावी. ही कामे युद्धस्तरावर राबवून मे महिनाअखेरपर्यंत पूर्ण करावीत. 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' ही योजना प्रभावीपणे राबवावी.उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानाच्या भरपाईसाठी पहिल्या टप्प्याचा निधी वितरित होत आहे. उर्वरित दोन टप्प्यातील निधीही तत्काळ वितरित करण्यात येईल.। **पान २ वर**

## कुनो राष्ट्रीय उद्यानातील आणखी एका चित्त्याचा झुंजीत मृत्यू

कुनो : दक्षिण आफ्रिकेतून आणल्यानंतर मध्य प्रदेशातील कुनो राष्ट्रीय उद्यानात ठेवलेल्या चित्त्यांपैकी आणखी एकाचा मंगळवारी ( ९ मे ) मृत्यू झाला. चित्त्यांमध्ये झालेल्या झुंजीत 'दक्षा' या मादीचा मृत्यू झाल्याचं सांगण्यात येत आहे. 'दक्षा'सह आतापर्यंत तीन चित्त्यांचा मृत्यू झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, नर 'वायू', 'फिंडा' आणि 'अग्नि' या चित्त्यांची मादी 'दक्षा'बरोबर झुंज झाली. या झुंजीत 'दक्षा' गंभीररित्या जखमी झाली होती. यानंतर 'दक्षा'चा मृत्यू झाला आहे. यापूर्वी २३ एप्रिलला सहा वर्षाच्या 'उदय' नावाच्या चित्त्याचा मृत्यू झाला होता.



दक्षिण आफ्रिकेतील नामिबियातून मध्यप्रदेशातील कुनो राष्ट्रीय उद्यानात २० चित्ते आणले गेले होते. यातील तीन चित्त्यांचा आतापर्यंत मृत्यू झाला होता. सर्वात पहिल्यांदा 'साशा' या मादी चित्त्याचा २७ मार्च रोजी मूत्रपिंडाच्या आजाराने मृत्यू झालेला. तर, 'उदय' हा चित्ता २३ एप्रिलला निश्चल अवस्थेत आढळून आला होता. नंतर त्याचाही मृत्यू झाला. अशातच आज ( ९ मे ) 'दक्षा' या मादी चित्त्याचा मृत्यू झाल्याने कुनो उद्यानात २० पैकी १७ चित्ते उरले आहेत.

## शिक्षकांची पहिल्या टप्प्यात ३० हजार तर दुसऱ्या टप्प्यात २० हजार पदे भरणार

### शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांची माहिती



मुंबई : पहिल्या टप्प्यात ३० हजार तर दुसऱ्या टप्प्यात २० हजार शिक्षकांची भरती केली जाणार आहे, अशी माहिती राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी दिली. तसेच आधार व्हेरिफिकेशन विद्यार्थ्यांचे पूर्ण झाल्यानंतर दुसऱ्या टप्प्यातील शिक्षक भरती संदर्भात आकडा कळेल, असेही त्यांनी म्हटले. एका वाहिनीशी संवाद साधताना त्यांनी ही माहिती दिली. शिक्षक भरती संदर्भात केसरकर म्हणाले की, नवीन शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वीच ही शिक्षक भरती करण्याचा आमचा विचार आहे. शंभर टक्के शिक्षक भरती होणार आहे. त्यासाठी संचमान्यता झाली पाहिजे. कारण आरक्षणानुसार ही पदे भरती होईल. उमेदवारांच्या मुलाखती होऊन त्यांची भरती केली जाईल. शिक्षकांच्या बदलीसंदर्भात ग्रामविकासमंत्री। **पान २ वर**

## भारतीय लष्करात मोठे बदल, ब्रिगेडीयरसह अनेक अधिकाऱ्यांना एकसारखाच गणवेश

नवी दिल्ली : भारतीय लष्करात सध्या अनेक बदल होताना दिसत आहेत. स्त्री-पुरुष समानतेसोबत भारतीय लष्कराला मजबूत करण्यासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात येत आहेत. आता भारतीय लष्करी ब्रिगेडीयर तसेच त्याच्यावरील अधिकाऱ्यांना एकसारखे गणवेश देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, नुकत्याच झालेल्या भारतीय लष्कराच्या संमेलनतील विस्तृत चर्चेदरम्यान हा निर्णय घेण्यात आलेला आहे. परंतु लष्करातील कर्नल आणि त्यांच्या खालच्या पदावरील अधिकाऱ्यांच्या गणवेशमध्ये कोणताही बदल होणार नसल्याचं सांगण्यात येत आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ब्रिगेडीयर आणि त्यावरील अधिकाऱ्यांचे हेडगियर, शोल्डर रँक बॅज, गॉर्गेट पॅच, बेल्ट आणि शूज आता सारखेच असतील. हा बदल यावर्षी एक ऑगस्टपासून करण्यात येणार असल्याचं सांगितलं जात आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सीमेवरील जवानांमध्ये सामान्य ओळख आणि दृष्टीकोन निर्माण होण्यासाठी हा निर्णय घेतला असल्याचं सांगण्यात येत आहे. हा निर्णय कोणताही पक्षपाती पणा न करता भारतीय सैन्याला एकत्र आणि एकसमान बांधून ठेवण्यासाठी घेतला असल्याचं देखील सांगण्यात येत आहे. । **पान २ वर**

## कर्नाटक विधानसभेसाठी आज मतदान, ५ कोटी ३१ लाख मतदार बजावणार हक्क



कर्नाटक : कर्नाटक विधानसभा निवडणुकीसाठी आज मतदान होणार आहे. मतदार कर्नाटकमध्ये सत्तेच्या चाव्या कुणाच्या हाती देणार हे आज ठरवणार आहेत. आज (१० मे) सकाळी सात वाजल्यापासून संध्याकाळी सहा वाजेपर्यंत मतदारांना त्यांच्या मतदानाचा हक्क बजावता येणार आहे. यंदाच्या निवडणुकीसाठी कर्नाटकातील ५ कोटी ३१ लाख मतदार मतदान करणार असून हे मतदान राज्यातील २,६१५ उमेदवारांचे भवितव्य ठरवणार आहेत. कर्नाटकातील विधानसभा निवडणुकीसाठी होणाऱ्या मतदानासाठी प्रशासन सज्ज झालं असून राज्यभरातील एकूण ५८,५४५ मतदान केंद्रांवर मतदान करण्याची सुविधा प्राप्त करुन देण्यात येत आहे. मतदानादरम्यान एकूण ७५,६०३ बॅलेट युनिट (BU), ७०,३०० कंट्रोल युनिट (CU) आणि ७६,२०२ व्होटर व्हेरिफायेबल पेपर ऑडिट ट्रेल । **पान २ वर**



## महाराष्ट्रातील तीन पोलिसांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते शौर्य पुरस्कार प्रदान

नवी दिल्ली : पोलीस सेवेत साहसी कामगिरी करणाऱ्या महाराष्ट्रातील तीन पोलिसांना आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते 'शौर्य पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. राष्ट्रपती भवन येथील दरबार सभागृहात आज 'शौर्य पुरस्कार' प्रदान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रपती श्रीमती मुर्मू यांच्या हस्ते याप्रसंगी शौर्य पुरस्कार आणि कीर्ती चक्र प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमास उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, संरक्षण मंत्री राजनाथ सिंग तसेच केंद्रीय मंत्रिमंडळातील सदस्य उपस्थित होते.या कार्यक्रमात महाराष्ट्रातील भारतीय पोलीस सेवेचे (आयपीएस) सोमय मुंडे, पोलीस नाईक टीकाराम काटेंगे आणि पोलीस कॉन्स्टेबल रवींद्र नेताम यांना नक्षलवाद्यांविरोधात केलेल्या कारवाईसाठी 'शौर्य पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले.आज झालेल्या कार्यक्रमात २९ शौर्य पुरस्कार आणि ८ कीर्ती चक्र प्रदान करण्यात आले. यामध्ये पाच मरणोत्तर पुरस्कारांचा समावेश आहे.

## मतदानाची टक्केवारी वाढविण्यावर भर द्या

### मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे

सातारा : राष्ट्रीय मतदानाच्या टक्केवारी पेक्षा जास्त मतदान कसे होईल याकडे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी लक्ष द्यावे, अशा सूचना अपर मुख्य सचिव आणि मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी दिल्या.



जिल्हा नियोजन भवन जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा येथे निवडणूक पूर्व आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी जिल्हाधिकारी रुचेश जयवंशी, उपजिल्हाधिकारी व उपजिल्हा निवडणूक अधिकारी निता सावंत-शिंदे उपस्थित होते. यावेळी श्री. देशपांडे म्हणाले की, मतदानाच्या टक्केवारीमध्ये वाढ होणे अपेक्षित आहे. मतदार यादीची छाननी करुन मयत मदारांना वगळण्यात यावे. यासाठी आवश्यक असल्यास संबंधितंना स्पीड पोस्टद्वारे नोटीस पाठवावी. प्रभाग निहाय मेळावे घेऊन नागरिकांमध्ये मतदानाबाबत जागृती करावी. यामध्ये मतदार यादीचे वाचन करुन मतदार नोंदणीबाबत नागरिकांच्या अडचणी सोडवाव्यात. मतदान केंद्रासाठी पोलीस स्टेशन निहाय पाहणी करावी. मतदान केंद्रावर सर्व सुविधा उपलब्ध कराव्यात. १८ ते १९ वयोगटातील मतदारांसाठी शाळा-महाविद्यालयांमध्ये मेळावे घेऊन विद्यार्थ्यांकडून मतदार नोंदणी अर्ज भरुन घ्यावेत. तसेच महाविद्यालयामध्येच त्या अर्जाचे निराकरणासाठी यंत्रणा उभारावी, अशा सूचना त्यांनी केल्या. यावेळी त्यांनी तहसिलदार, बीएलओ व डेटा ऑपरेटर यांच्याही अडचणी जाणून घेतल्या.या बैठकीस मतदार नोंदणी अधिकारी, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी, निवडणूक नायब तहसिलदार व बीएलओ उपस्थित होते.

## आफताब पुनावालावर आरोप निश्चिती, १ जूनपासून सुनावणी सुरू

नवी दिल्ली : देशभर खळबळ उडवून देणाऱ्या श्रद्धा वालकर हत्याकांडात आरोपी आफताब पुनावाला याच्यावर आता आरोप निश्चित करण्यात आले आहेत. श्रद्धाची हत्या



करुन पुरावे नष्ट करण्यासाठी तिच्या शरीराचे तुकडे केल्याचा आरोप आफताबवर ठेवण्यात आला आहे. या प्रकरणाची सुनावणी आता १ जूनपासून दिल्लीच्या साकेत सत्र न्यायालयात सुरू होणार आहे. श्रद्धा वालकरच्या वडिलांनी आरोपीला फाशीची शिक्षा देण्यात यावी अशी मागणी केली आहे. आफताब पुनावालाने त्याच्या लिव्ह-इन पार्टनर श्रद्धा वालकरचा गळा दाबून खून केल्याचा आणि तिच्या शरीराचे तुकडे केल्याचा आरोप आहे. मात्र आफताबने हे सर्व आरोप फेटाळून लावत खटल्याला सामोरे जाणार असल्याचं सांगितले. या प्रकरणाची सुनावणी दिल्लीच्या विशेष सत्र न्यायालयात १ जून पासून सुरू होणार आहे. या प्रकरणातील आरोपी आफताब पुनावालाला फाशीची शिक्षा होईल, अशी आशा श्रद्धा। **पान २ वर**

# मल्लिकार्जुन खरगे दलित समाजाचे असल्याने काँग्रेसने त्यांना संधी आली तेव्हा मुख्यमंत्री केले नाही : ना.आठवले



मुंबई : काँग्रेसने नेहमी दलित मतांचा वापर केला मात्र दलितांना कधीही न्याय दिला नाही. मल्लिकार्जुन खरगे यांना मुख्यमंत्रीपद देण्याची संधी जेव्हा आली होती तेव्हा ते दलित समाजाचे असल्याने काँग्रेसने मल्लिकार्जुन खरगे यांना मुख्यमंत्री केले नाही. खरगे यांना काँग्रेसने पक्षाध्यक्षपद दिले असले तरी ते नामधारी अध्यक्ष आहेत. काँगेसच्या अधिकारांचे सर्व सुत्र राहुल गांधी आणि सोनिया गांधी यांच्याकडेच आहे.

त्यामुळे दलितांना न्याय देवू शकत नसणा-या काँग्रेस पक्षाला कर्नाटकच्या निवडणुकीत पराभवाचा धडा शिकवा असे आवाहन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी केले. बिदर आणि बेळगांव या जिल्हयात भाजप उमेदवारांचा प्रचार ना. रामदास आठवले यांनी केला. त्यात बिदर येथील सभेत ना. रामदास आठवले बोलत होते. यावेळी केंद्रीय राज्यमंत्री भगवंत खुबा, भाजपचे उमेदवार प्रकाश खडरे उपस्थित होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदींवर काँग्रेस नेत्यांनी ९१ वेळा शिवीगाळ केली आहे. काँग्रेसच्या या वृत्तीचा आम्ही निषेध करतो. काँग्रेसने कितनी भी दी मोदीजी को गाली लेकिन मोदी है गरिबोंके सच्चे वाली अशी कविता सादर करुन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे खरे विकासपुरुष नेते असल्याचा गौरव ना. रामदास आठवले यांनी केला. ज्यांना घर नाही त्यांना घर देण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना, गॅस मोफत देणारी उज्वला योजना, गरीब बेरोजगारांना धंदा उद्योगासाठी विना अट कर्ज देणारी मुद्रा योजना, ज्यांचे बँकेत खाते नाही अशा गरीबांना बँक खाते खोलून देण्याचे काम अशी गरीबांना मदत करणारी अनेक कामे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे करीत आहेत. त्यामुळे नरेंद्र मोदी हे गरीबांचे खरे वाली आहेत. त्यांना शिवी देणाऱ्या काँग्रेसला पराभवाची धुळ चारा असे आवाहन ना. रामदास आठवले यांनी केले.



# रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया अल्पसंख्यक युवक पदाधिकारी निवड

अक्कलकोट/प्रतिनीधी: रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया सोलापूर व अल्पसंख्यांक विभाग सोलापूर शाखेची बैठक सोलापूर शासकीय विश्रामगृह येथे घेण्यात आली या बैठीकीच्या अध्यक्षपदी प्रदेश अधक्ष सुबोध वाघमोडे हे होते या वेळी रिपब्लिकन पार्टीचे माणिक आठवले जक्कपा कांबळे, मारुती सोनवले, श्रीकांत गायकवाड, अल्प संख्यक जिल्हा अध्यक्ष सलीम भाई मुल्ला, रफिक शेख, इम्रान शेख, सादिक शेख, इब्राहिम शेख व अल्पसंख्यांक युवक अध्यक्ष सिकंदर शेख महिला जिल्हा अध्यक्ष अरुणा सरवदे शहर अध्यक्ष पूनम मोरे नसरीन शेख पूजा माने आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते या वेळी समीर मुजावर कार्य अध्यक्ष मोहसीन शेख मैनूदिन मिर्झा शहर उपाध्यक्ष शहर संघटक अन्वर शेख रिक्षा वाहतूक संघटना संघटक अनिस शेख आदी कार्य कर्त्यांना पदे देण्यात आली शेवटी आभार प्रदर्शन करण्यात येऊन बैठकीचे समारोप करण्यात आला

# इंजिनिअर विवेक गायकवाड यांची बिर्ला रिऍलिटी मध्ये असिस्टंट मॅनेजर पदावर झाली नियुक्ती



सोलापूर/प्रतिनिधी :अचलेर येथील शंभु महादेव कावडी चे मुख्य मानकरी शंकर साधू गायकवाड यांचे चिरंजीव परमेश्वर गायकवाड यांचा मुलगा इंजिनिअर चि विवेक परमेश्वर गायकवाड यांची आज जगातील सुप्रसिद्ध बिर्ला रिऍलिटी ग्रुप कंपनीच्या असिस्टंट मॅनेजर पदावर नियुक्ती झाली आहेइंजिनिअर विवेक गायकवाड यांची ही नियुक्ती कल्याण जिल्हा ठाणे येथील बिर्ला रिऍलिटी कंपनी कार्यालयात करण्यात आली आहेइंजिनिअर विवेक गायकवाड हे अचलेर येथील श्री शंभु महादेव कावडी चे मुख्य मानकरी शंकर साधू गायकवाड यांचे नातु असून सोलापूर येथील जेष्ठ पत्रकार महेश गायकवाड यांचे पुतणे आहेत तर सोलापूर शहर राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस आणि युवा उद्योजक व रावण साम्राज्य सामाजिक संघटनेचे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष सुयश गायकवाड यांचे चुलत भाऊ आहेतइंजिनिअर विवेक गायकवाड यांची बिर्ला कंपनी मध्ये झालेली निवड शंकर साधू गायकवाड घराण्याची शान ठरली आहे, अशी प्रतिक्रिया पत्रकार महेश गायकवाड यांनी नोंदविली आहे, तर इंजिनिअर विवेक गायकवाड यांचे चेतना बिल्डर्स चे मालक तुकाराम गायकवाड त्यांचे बंधू गुलाब गायकवाड यांच्या सह त्यांच्या नातेवाईक आणि गुलबर्गा येथील इंजिनिअर विवेक यांची आत्या अन्नपूर्णा बाई नवले यांनी अभिनंदन केले असून विवेक ला पुढील सर्व्हिससाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



# कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या स्मृती दिनानिमित्त बार्टी च्या वतीने अभिवादन

सोलापूर/प्रतिनिधीः डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टीच्या वतीने समाजकल्याण सचिव मा.सुमंत भांगे साहेब व महासंचालक सुनिल वारे साहेब यांच्या संकल्पनेतून व समाजकल्याण सह आयुक्त नागेश चौगुले व विस्तार व सेवा विभाग प्रमुख डॉ सत्येंद्रनाथ चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली गरीबांच्या झोपडीपर्यंत शिक्षणाची ज्ञानगंगा पोहोचवणारे, बहुजनांच्या शिक्षणासाठी आपले संपूर्ण आयुष्य झिजवणारे, शिक्षण महर्षी, शिक्षणाचे महामेरू, शिक्षण प्रसारक, रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक, थोर समाजसुधारक, पद्मभूषण, डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या स्मृती दिनानिमित्त सी.बी.खेडगी महाविद्यालय अक्कलकोट येथे प्राचार्य डॉ एस.सी अडवितोट व समतादुत नालंदा चंदनशिवे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले कार्यक्रम प्रस्ताविक डॉ गणपतराव कलशेट्टी यांनी केले कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्था व यांच्या जीवन कार्यावर थोडक्यात प्रकाश टाकला सौ चंदनशिवे मॅडम नी समान संधी केद्रा मार्फत विद्यार्थ्यांच्या समाजकल्याण व शैक्षणिक समस्या यातील दुवा म्हणजे समान संधी केंद्र यासंदर्भात व तसेच बार्टीच्या योजना व समाजकल्याण कार्यालय योजनांची माहिती दिली कार्यक्रम सुत्रसंचलन प्रा.सिध्दाराम पाटील व आभारप्रदर्शन प्रा.किशोर थोरे यांनी केले

# चक्क वळीव पाऊस पडल्यामुळे शेतकऱ्यांने आपला आनंद शेतामध्ये केक कापून पावसाचे स्वागत केले

टाकळीवाडी/नामदेव निर्मळे : टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील शेतकरी श्री दादा खोत माजी सैनिक यांनी वळीव पाऊस पडल्यामुळे शेतामध्ये केक कापून आपला आनंद साजरा करून पावसाचे स्वागत केले.

टाकळीवाडी मध्ये गेले दोन महिने झाले वळीव पाऊस नव्हता. शेतकरी चातक पक्षाप्रमाणे आभाळाकडे बघत होता. पिके करपत होती उन्हामुळे हे शेतकऱ्याला सहन होत नव्हते. टाकळीवाडी मध्ये माळ रान भरपूर असल्यामुळे बोर ,विहिरी यांना पाणी कमी आले होते. पाण्याचे नियोजन होत नव्हते. पिके करपत होती. पिकानी सुद्धा आता धीर सोडलेला होता. शेतकरी चिंताग्रस्त झालेला होता. शेतकऱ्याची झोप उडाली होती. काल वळीव पाऊस पडल्यामुळे शेतकरी खुश झाला. पिकांना थोडाफार आधार झाला. याचा आनंद एका शेतकऱ्याने केक कापून स्वागत केले.



शेतकऱ्याचे सर्व जीवनमान शेतीवरच अवलंबून आहे. दोन महिने झाले उन्हाळा फार जाणवत होता. वळीव पाऊस नसल्यामुळे शेतकऱ्याची झोप उडाली होती. शेतकऱ्यांना बोलवून त्यांनी केक कापून सर्वांचा आनंद वाढवला.आनंद काय असतो हे शेतकऱ्याकडून शिकावे लागेल. आला रे आला पाऊस आला. शेतकऱ्यांचा राजा पाऊस आला. अशा घोषणा देत आनंद साजरा केला.जय किसान, जय किसान, जय विज्ञान, घोषणा देऊन सर्वांना उत्तेजित केले. शेतकऱ्याने ऊसाला केक भरवत आपला आनंद व्यक्त केला.यावेळी माजी सैनिक लक्ष्मण निर्मळे, पुंडलिक निर्मळे (शेतकरी), प्रणव कुंभार, कु आरोही पकाणे , कुमारी राजनंदिनी निर्मळे ,भोपाल बदामे उपस्थितीत होते.

# गीतांजली कोळी यांच्या उपोषणाची दखल घ्या ! अन्यथा महाराष्ट्र पेटून उठेल : गणेश अंकुशराव



पंढरपुर/प्रतिनिधीः धुळे जिल्हा कोळी समाजाच्या अध्यक्षा सौ. गीतांजलीताई कोळी या २५ एप्रिल २०२३ पासून महादेव कोळी, टोकरे कोळी, ढोर कोळी, मल्हार कोळी जमातीच्या लोकांना जात प्रमाणपत्र सुलभरीत्या मिळावे म्हणून उपोषणाला बसलेल्या आहेत आज १४ दिवस पूर्ण झाले आहेत परंतु प्रशासनाने कोणतीही दखल घेतलेली नाही त्यामुळे गीतांजली कोळी यांच्या जीविकास धोका निर्माण झाला आहे. उपोषणाची दखल न घेतल्यास व त्यांच्या जीवितास धोका निर्माण झाल्यास संपूर्ण महाराष्ट्र पेटेल असा इशारा वाल्मिकी संघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव यांनी आज दिला आहे.

पंढरपूर जिल्हा सोलापूर येथे आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरे चौक येथे धुळे जिल्हा प्रशासनाच्या विरोधात निषेधाच्या घोषणा देण्यात आल्या. राज्यघटनेच्या कलम १४ नुसार महाराष्ट्रात राहणार्या कोणत्याही व्यक्तीला जात, वंश, परंपरा व राहण्याच्या ठिकाणावरून कोणताही भेदभाव करता येणार नाही असे असताना सुद्धा आदिवासी विभागाचे २५ आमदार व चार खासदार प्रांताधिकारी जात प्रमाणपत्र पडताळणी समिती या विस्तारित क्षेत्रातील ३३ अन्यायग्रस्त आदिवासी जमाती वरती अत्याचार करत आहेत. घटनेच्या कलम ३४२ नुसार दिलेले अनुसूचित जमातीचे आरक्षण मिळू देत नाहीत, सातत्याने खोटा प्रचार करत आहेत. त्यांचा निषेध करतो, तसेच १४ दिवस झाले अन्न पाण्याविना गीतांजलीताई कोळी यांचे आमरण उपोषण धुळे जिल्हाधिकारी कार्यालय येथे सुरू आह. प्रशासनाने त्वरित दखल घ्यावी.१४ दिवस उपोषण केल्यामुळे गीतांजली ताई यांना प्रचंड थकवा जाणवत आहे, त्यांची तब्येत ढासळत चाललेली आहे. कोणत्याही क्षणी त्यांच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो याची जाणीव प्रशासनाने ठेवावी. गीतांजली ताई यांच्या जीवितास धोका निर्माण झाल्यास संपूर्ण महाराष्ट्र पेटेल. असा इशारा महर्षी वाल्मिकी संघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव यांनी यावेळी दिला. यावेळी निषेधाच्या घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला होता . यावेळी वाल्मिकी संघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव, सोमनाथ मगर, पांडुरंग कांबळे, आप्पा करकमकर, वसे सर,,संपत सर्जे, सुरज कांबळे, विकी अभंगराव, पिंटू करकमकर, पांडुरंग माने, कृष्णा वाडेगावकर, विकी अधटराव, वासुदेव परचंडे, दादा सर्जे, अमोल तावसकर, पंकज अंकुशराव, गुंडू नेहतराव, महेश भाळवणकर, मंगेश मुसळे, यांच्यासह मोठ्या संख्येने आदिवासी कोळी बांधव उपस्थित होते.

## नवी मुंबई ते कफ परेड बेस्ट बस सेवा सुरु करण्याचे महिला व बालविकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांचे निर्देश

मुंबई : नवी मुंबई ते कफ परेड बेस्ट बस सेवा सुरु करण्याची मागणी लक्षात घेता याबाबत स्थानिक प्रशासनाने कार्यवाही करण्याचे निर्देश महिला व बालविकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिले.

फोर्ट येथील मुंबई महापालिकेच्या ए वॉर्ड येथे पुण्योक अहिल्यादेवी होळकर स्त्री शक्ती समाधान शिबिर (सरकार आपल्या दारी) कार्यक्रमात महिला व बालविकास मंत्री मंगलप्रभात लोढा बोलत होते. यावेळी स्थानिक लोकप्रतिनिधी व अधिकारी या कार्यक्रमाला उपस्थित होते.

मंत्री श्री.लोढा म्हणाले, आज ९०९ तक्रारी दाखल झाल्या असून १३२ तक्रारींचे तात्काळ निराकरण करण्यात आले आहे. उर्वरित तक्रारींचेदेखील वेळेत निराकरण करून समस्या प्राधान्याने सोडविण्यात येतील असेही ते म्हणाले.

यावेळी महिलांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली तसेच बँका आणि महिला आर्थिक विकास महामंडळ आणि विविध विभागांचे स्टॉल लावण्यात आले होते. या स्टॉलमध्ये शासनाच्या विविध विभागांकडून महिलांकरिता राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती महिलांना देण्यात आली.

अंधेरी गुंदवली येथील के ईस्ट वॉर्ड येथे दिनांक १० मे रोजी पुण्योक अहिल्यादेवी होळकर स्त्री शक्ती समाधान शिबिर (सरकार आपल्या दारी) कार्यक्रम आयोजित केला आहे. या उपक्रमात महिलांना तक्रारीसाठी प्रत्येक वॉर्डमध्ये ऑनलाईन अर्जही करता येणार आहे. हा उपक्रम ३१ मे २०२३ पर्यंत दुपारी ३ ते ५.३० या वेळेत सुरू राहणार आहे. अधिक माहितीसाठी व अर्ज भरण्यासाठी https://forms.gle/7GzCSACLYsj38amq9 या लिंकवर जाऊन माहिती भरता येऊ शकते.

## शब्दकोडे क्र १२९



आडवे शब्द ३. मनमानीपणे वागणारा ६. आपले काय कर्तव्य असा प्रश्न पडलेला! १०. ओढाताण ११. असंमती १२. मोठा १४. पदावरून हकालपट्टी १६. कृत्रिम पण उपयोगी दंतसंच १७. पचनसंस्थेतील लांबलचक भाग १९. प्रश्न २०. हसतमुख २२. आयुर्वेदिक उपचार करणारा २३. वाळू २४. वृक्ष २५. देवाला सोडलेला २६. सुट्टीचा वार २य७. पुष्परस २८. अतिरिक्त ३०. लाडके मूल ३२. महाराष्ट्राच्या सीमेवरील चिमुकला प्रांत ३३. मतभेद ३५. जहाजावरील महत्त्वाचा कामगार ३६. दर सेकंदाला, सतत ३८. जगदंबा ४०. जहाल विष ४१. काव्य ४२. रुची ४३. रक्तवाहिनी ४४. अंदाज, ठोकताळा ४५. दोन तुकडे होणे ४७. चंचल धोरण ४९. फिर्याद ५२. फोडणीचे वरण ५४. आयुष्यातील पथदर्शक ५६. डावा ५७. अमावास्या ५८. बेसन, कांदा, तिखट मिरची वापरून केलेला लोकप्रिय तळीव पदार्थ ५९. सापाची त्वचा ६०. शुष्कता ६१. चढाओढातील विजय ६३. परीट ६४. लोभ ६५. भिकेची थैली ६६. चरण ६७. पायपीट ६८. गर्दी ७०. लक्ष्य ७१. कंत्राट ७२. पराभव ७३. आंबट चवीची पालेभाजी ७४. धार्मिक पुस्तक ७५. जागरूक ७६. उष्णता ७७. गुलामी ७८. पार, गप्पा मारण्याची जागा ७९. संघर्ष ८१. लहर ८२. प्रकाशकिरण ८३. उपवासाला झटपट केला जाणारा बटाट्याचा पदार्थ ८४. गर्दी ८५. नूतन ८७. विष्णू ८९. पश्चाताप ९१. अतिशय सुंदर स्त्री ९२. मुख्य रस्ता ९६. आसक्ती सरणे, विरक्ती ९७. चुकून, नकळत ९८. गुणांची कदर करणारा

उभे शब्द १. मोड, कोंब २. सूक्ष्म तपशील ३. विरूप, असुंदर ४. च्या संदर्भात ५. दडपण ६. भीतीने किंवा रागाने ओरडणे ७. हात ८. दुखावलेला ९. शैली, धाटणी ११. पती १३. कलंक १५. अर्धचंद्र १६. वाळवी १७. आरंभीचा १८. मुक्कामास येणे १९. पक्का रस्ता २०. लहान २१. श्वसनासाठी आवश्यक २२. कायदेशीर २४. 'फिटे अंधाराचे जाळे.....' २६. जाडसर दळलेले गहू २७. माज २९. विलंब, दिरंगाई ३१. कोरड ३२. पोती ३३. व्यर्थ ३४. कबुतराच्या आकाराचा पक्षी ३७. नाशवंत ३८. आवेश ३९. माहेरपणाला आलेली ४०. प्रत्येक ४२. फुटाणे ४३. गलबताला गती व वेग देणारे कापड ४६. विष्णूमंदिरात गरुडाच्या मूर्तीची जागा ४८. चंद्र ४९. गावातील रहिवासी ५०. क्षय, नाश ५१. पेज ५३. अभिप्राय ५५. साचा ५७. बोकड ५८. संसाररूपी सागर ६०. जाळे विणणारा कीटक ६२. गोळा ६३. पुढील बाजूला तोफ असणारे पायदळातील मजबूत वाहन ६५. झूला ६९. जवळीक ७१. पुढच्याला लागली तरी मागचा शहाणा होतोच असे नाही ७२. हसणे ७३. विडी ७६. दैनंदिन धार्मिक कृत्ये ७७. नोकर ७८. दफनभूमी ७९. बाळाचे अंगडे ८०. किल्ला ८१. सौंदर्य ८३. दया ८५. नववी तिथी ८६. विरोध ८८. साखर ८९. मोठ्या मनाचा ९०. पंख ९३. या झाडापासून कात मिळतो ९४. पोलिसी गणवेश ९५. न बोलण्याचे व्रत

